राज्यातील नवनिर्मित आरोग्य संस्था तसेच ट्रामा केअर युनिटकरिता यंत्रसामग्री खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः खरेदी-२०१९/प्र.क्र.१०८/आरोग्य-८
नविन मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय कंपांउंड,
कॉम्पलेक्स बिल्डींग, १० वा मजला, मुंबई ४००००१
दिनांक: १८ सप्टेंबर, २०१९.

संदर्भ-

१) सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/कक्ष-३/टे-३/१९-२०/जिरु/ट्राकेयु/अनुग्रा/प्रमा/८०११/१९,दि.१४.६.२०१९.

२) सहसंचालक,आरोग्य सेवा,रुग्णालये(राज्यस्तर),आरोग्य सेवा संचालनालय मुंबई यांचे पत्र क्रमांक संआसे/कक्ष-३/टे.३/१९-२०/जिरु./ट्राकेयू/अनुग्रा/प्रमा/१२२६२/ दि.७.९.२०१९

३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७.

प्रस्तावना -

राज्यातील नवनिर्मित ट्रामा केअर युनिट व इतर रुग्णालयांकरिता यंत्रसामग्री व साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांनी दिनांक १४/०६/२०१९ व दिनांक ७.९.२०१९ च्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे. त्याअनुषंगाने नमूद करण्यात येते की, दिनांक २६.७.२०१७ रोजीच्या शासन निर्णयाअन्वये हाफकीन महामंडळ अंर्तगत स्थापन केलेल्या खरेदी कक्षाकडूनच औषधी, तदअनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकिय उपकरणे खरेदी करण्याचे धोरण असल्याने हाफकीन महामंडळाकडून औषधी व इतर साधन सामुग्री खरेदीसाठी निविदा मागवून त्या एल १-निविदाकारास शोधण्यासाठी व खरेदीचे आदेश देईपर्यंत खुप उशिर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सप्टेंबर २०१९ पासून निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता लागल्यानंतर प्रशासकिय मान्यता देता येणार नाही. त्यामुळे सन २०१९-२० या आर्थीक वर्षात मंजूर अनुदानाची निविदा प्रक्रीया राबविण्यासाठी प्रशासकिय मान्यता देण्यात यावी व सन २०१९ अखेर पर्यंत (३१ मार्च २०२०) बिडिएस प्रणालीवर वितरीत असलेल्या अनुदानाच्या मर्यादेतच खर्च करावा व उर्वरित अर्थसंकल्पीत अनुदानाच्या वितरणासाठी शासनास प्रस्ताव सादर करावा, या अटीवर व खालील अटींच्या अधिन राहून सोबतच्या विवरणपत्रातील यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी निविदा

प्रक्रीया राबविण्यासाठी रुपये ४९,८३,८९,६१६/-इतक्या रक्कमेस प्रशासकिय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय-

राज्यातील नवनिर्मित १२ ट्रामा केअर युनिटकरिता खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेल्या रुग्णालयीन यंत्रसामुग्री खरेदीसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मंजूर अनुदानामधून वितरीत केलेल्या तरतूदीतून यंत्रसामुगी खरेदीसाठी निविदा प्रक्रीया राबविण्यासाठी खालिल अटींच्या अधिन राहून रुपये ४९,८३,८९,६१६/- (रु.एकोणपन्नास कोटी त्र्याऐंशी लाख एकोणनव्वद हजार सहाशे सोळा फक्त) इतका खर्च करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

NAME OF EQUIPMENT STATEMENT

Sr. No	NAME OF EQUIPMENRT	Revised Approx Rate	Reginal Imbalance		HOSPTALS		TRAUMA CARE UNIT	
			Qty	Total Cost	Qty	Total Cost	Qty	Total Cost
1	300 M.A. X Ray machine with Turn Key	2000000/-	2	4000000	12	24000000/-	0	0
2	Portable 100 MA X-Ray	1100000/-	0	0	28	30800000/-	0	0
3	Adult & Pediatric Ventilator	850000/-	0	0	91	77350000/-	0	0
4	Sonography Machine	1250000/-	0	0	18	22500000/-	0	0
5	Anesthesia Machine	1140000/-	1	1140000	52	59280000/-	0	0
6	Auto clave HP (Horiz.)4 Drums 400 X 600	122500/-	0	0	16	1960000/-	0	0
7	Auto clave HP (Horiz.)4 Drums 1500 X 600X900	627624/-	0	0	12	7531488/-	0	0
8	6 Multipara Monitors with one central work station	3079519/-	0	0	13	40033747/-	0	0
9	500 M.A. X Ray machine	2200000/-	0	0	2	4400000/-	0	0
10	Hospital Bed with Backrest with Foam Mattress & Pillow	11949/-	61	728889	1471	17576979/-	0	0
11	Bedside lockers	4614/-	51	235314	1643	7580802/-	0	0
12	Cautery (Surgical diathermy)	110000/-	4	440000	51	5610000/-	0	0
13	Dressing Trolly	18900/-	2	37800	62	1171800/-	0	0
14	Foot suction machine	26000/-	0	0	113	2938000/-	0	0
15	Fowler Beds with matress	41000/-	7	287000	263	10783000/-	0	0
16	Instrument Trolly	16532/-	1	16532	74	1223368/-	0	0
17	Linen Trolly	5428/-	1	5428	47	255116/-	0	0
18	Microscope (Binocular)	20000/-	1	20000	70	1400000/-	0	0
19	Operation Table (Hydraulic)	180000/-	1	180000	31	5580000/-	0	0
20	Operation Table (Ordinary)	50000/-	1	50000	45	2250000/-	0	0
21	Patient stools/Attenddant Stool	1980/-	61	120780	1259	2492820/-	0	0
22	Double dome shadowless ceiling mounted O.T.Lights	221760/-	2	443520	55	12196800/-	0	0
23	Double Sufface Phototherapy Unit	37000/-	0	0	14	518000/-	0	0
24	Shadoless O.T.Lights (Mobile)	120960/-	0	0	35	4233600/-	0	0
25	Strecher on trolly	11788/-	0	0	80	943040/-	0	0
26	Wheel chair	10663/-	8	85304	155	1652765/-	0	0
27	Computerised ECG Machine	136000/-	4	544000	74	10064000/-	0	0
28	Pulse Oxymeter with adult, pediatric and neonatal probe	100000/-	2	20000	125	12500000/-	0	0
29	Centrifuge	32000/-	0	0	20	640000/-	0	0
30	Eliza reader with washer	197599/-	0	0	4	790396/-	0	0

31	Examination table with footsteps	14406/-	3	43218	74	1066044/-	0	0
32	External Defibrilator with ECG monitor	401184/-	0	0	36	14442624/-	0	0
33	Fetoal monitor	140000	2	280000	49	6860000/-	0	0
34	Hot Air Oven	18564	0	0	12	222768/-	0	0
35	Incubators	20666/-	0	0	11	227326/-	0	0
36	Gynaec Electric Cautery	127500/-	2	255000	21	2677500/-	0	0
37	Gynaec Examination table with foot steps	22500/-	1	22500	33	742500/-	0	0
38	Lobour table with head low facility	80616/-	3	241848	59	4756344/-	0	0
39	Rediant Infant	27000/-	3	81000	35	945000/-	0	0
40	Two body mortuary cabinet	399000/-	1	250000	15	3750000/-	0	0
41	Power Born Drill	881759/-	0	0	22	19398698/-	0	0
42	Pnumatic Tourniquet	330000/-	0	0	20	6600000/-	0	0
43	C-Arm compatible operation table with radiolucent top and fractureattachments	1153911/-	0	0	18	20770398/-	0	0
44	C-Arm Machine	2115680	0	0	3	6347040/-	14	29619520
	Total			**9708133**		**459061963**		**29619520**
	Total = **9708133+459061963+29619520 =498389616**/-							

अटी:-

१) सदरहू यंत्रसामग्रीची आवश्यकता/मागणी याची शहानिशा/खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदर यंत्रसामग्रीचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती/अधिकारी यांनी) मान्य केलेल्या विनिर्देशानूसार असावेत. तसेच सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच या बाबींची खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस २०१४/प्र.क्र.८२/भाग-III /उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतुदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे GEM Portal इतर राज्याचे दरकरार National pharmaceutical pricing Authority (NPPA) यांच्या कडील उपलब्ध असलेल्या न्युनतम दर विचारात घेण्यात यावेत तसेच हाफकीन संस्थेतील सदर बाबींची खरेदी केली जात असल्यास अथवा झालेली असल्यास निविदेत प्राप्त झालेले न्युनतम दर विचारात घेवुन त्या दरांना अंदाजित दर म्हणून गृहित धरण्यात यावे व त्यानुसार निविदेकरीता मागणी नोंदवितांना औषधी,औषधे साहित्य व उपकरणांच्या संदर्भात अंदाजीत दर म्हणून नोंदविण्यात यावेत व खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा.सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व/ पुरवठानंतर नमुना तपासणी (Pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदर खरेदीवर होणारा खर्च सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मंजूर झालेल्या अनुदानातून खालील लेखाशिर्षांअंतर्गत भागविण्यात यावा.

अ) २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०१ नागरी आरोग्य सेवा-विषम चिकित्सा ११०- रुग्णालये व दवाखाने ११०-७ पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, प्रादेशिक असमतोल दूर करणे (०६)(०२)-मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये ५२- यंत्रसामग्री व साधनसामग्री (२२१० ३०४७)

आ) ४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ८०० इतर खर्च (०१ इतर खर्च) (०१)(०३)-ट्रामा केअर युनिटची स्थापना- महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा (कार्यक्रम) ५२-यंत्रसामग्री व साधनसामग्री (४२१० ११७३)

इ) ४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०१ नागरी आरोग्य सेवा ११०- रुग्णालये व दवाखाने (०१)- रुग्णालये व दवाखाने, (०१)(०४)-मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये व दवाखाने ५२- यंत्रसामग्री व साधनसामग्री (४२१० ११०१)

ई) २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०१ नागरी आरोग्य सेवा-विषम चिकित्सा ११०- रुग्णालये व दवाखाने (०१)(०१)-मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये व दवाखाने ५२- यंत्रसामग्री व साधनसामग्री (२२१० ०१४६)

उ) २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०१ नागरी आरोग्य सेवा-विषम चिकित्सा ११०-७ पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०६)(०१)-मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये व दवाखाने ५२- यंत्रसामग्री व साधनसामग्री (२२१० ०२२६)

८) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन मधील अ.क्र.४, नियम क्रमांक ७ समोरील स्तंभ क्रमांक ६ येथील अटींची पुर्तता करण्यात यावी.

९) तसेच सदर यंत्रसामग्रीच्या खरेदीची द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

१०) संपुर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

११) दिनांक २६.०७.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनूसार कार्यवाही करण्यात यावी.

१२) सन २०१९ या आर्थिक वर्षात मंजूर अनुदानाची निविदा प्रक्रीया राबविण्यासाठी प्रशासकिय मान्यता देण्यात येत असून सन २०१९ अखेर पर्यंत ३१ मार्च २०२० पर्यंत बिडिएस प्रणालीवर

वितरीत असलेल्या अनुदानाच्या मर्यादेतच खर्च करावा व उर्वरित अर्थसंकल्पीत अनुदान वितरीत करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करावा.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते १२ येथे नमूद अटींची पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत कार्यक्रम प्रमुख यांची तसेच आरोग्य सेवा संचालनालयाची राहील.

२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग दोन मधील अ.क्र.४, नियम क्र. ७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१८२०४५५०९९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jamsher Samsher Tadavi

Digitally signed by Jamsher Samsher Tadavi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cc70f5be589b29aaa447f5cdd15c9826781de5daa02a4ecf339fb1d0559ab9d6, serialNumber=a92e218ede7b7c9acaa3bea18f6d46feab420783e12f260504f402b54de8c476, cn=Jamsher Samsher Tadavi
Date: 2019.09.19 12:19:48 +05'30'

(ज.स.तडवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
२) मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य विभाग) यांचे खाजगी सचिव
३) आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
४) व्यवस्थापकिय संचालक, हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि., मुंबई
५) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
६) सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
७) सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
८) सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) , आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
९) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई
१०) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), नागपूर
११) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१२) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१३) वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई
१४) निवडनस्ती (आरोग्य-८)